N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फार्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** कोरेगांव पार्क

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0061 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**03/05/2026 02:18

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिंनाक पासून):** 30/04/2026
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिंनाक पर्यंत):** 02/05/2026
**Time From (वेळेपासून):** 16:56 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 03/05/2026 **Time (वेळ):** 01:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 03/05/2026 01:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** हॉटेल कॉनरॅड ,कोरेगाव पार्क,पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निता चत्रभुज मिसाळ

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9822214414

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | वैशाली मुरलीधर तोटेवार | | पालक का नाम : तोटेवार | 1. 12/5,,स्वारगेट ,पोलीस अधीकारी वसाहत, ,पुणे, स्वारगेट,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | संभाजी शिवाजी चव्हाण | | पालक का नाम : चव्हाण | 1. 1291,चव्हाणवाडा, चिमण्यागणपती ,शेजारी, सदाशिवपेठ, ,पुणे,विश्रामबाग, पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 30,00,000/ रुपये (रूपये 500/ दराच्या 300 चलनी नोटा व तसेच 500 रु दराच्या 100 नोटांचे बंडल असणारे 5 | 3,000,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,000,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी निता चत्रभुज मिसाळ, वय- 47 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद-पोलीस उप अधिक्षक नेम, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे मो नं 9822214414

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे येथे पोलीस उप अधीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि.30/04/2026 रोजी 13.00 वा मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री.सतिश वाळके, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी 13.20 वा चे सुमारास त्यांचे कार्यालयात बोलावून तक्रारदार श्री.बाळासाहेब तुकाराम अवताडे,वय -59 वर्षे व्यवसाय शेती व जमीन खरेदी विक्री, राहणार- मुरकुटे नगर, शिरसवाडी, तालुका-हवेली जिल्हा-पुणे यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करा असे आदेशित केले व सदर कारवाई करीता ला.प्र.वि. कार्यालयात गोपनीय कामकाजाकरीता राखीव असलेले वनक्षेत्र कार्यालय व आरटीओ पिंपरी चिंचवड या कार्यालयातील पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले. आम्ही तक्रारदार यांना आमचे कक्षात घेवुन जावुन त्यांची तक्रार ऐकुन घेतली. त्यांनतर 13.50 वा चे सुमारास पंच लाप्रवि कार्यालयात आमचे कक्षात आले, त्यांना त्यांची नावे विचारली असता, त्यांनी त्यांची नावे पंच क्र.1 म्हणून श्री.प्रशांत पंढरीनाथ येवले, पद लिपीक, उप वनसर्व्हेक्षक, पुणे, व पंच क्र.2 म्हणून श्रीमती कोमल नामदेव कदम, पद लिपीक टंकलेखक, प्रादेशीक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड असे सांगितले व श्री येवले हे पंच क्रमाक 01 म्हणुन काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यांची तक्रारदार अवताडे व सापळा पथकातील अंमलदार मपोहवालदार/गोरे, सपोफौ बाठे यांचेशी ओळख करून दिली. तक्रारदार यांनी त्यांची तक्रार तोडी सांगितली. तसेच स्वहस्ताक्षरात लिहून दिली ती थोडक्यात पुढीलप्रमाणे,

"मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर मी माझे कुटंबासह राहणेस आहे. सन 2014 मध्ये मला माझे व्यवसायीक अडचणीमीळे पैशाची आवश्यकता होती म्हणुन मी माझे संपर्कातील इसम निलेश विलास हरगुडे यांचे मार्फत सावकार रामदास जगन्नाथ काळे यांचेकडुन 02 कोटी रुपये व्याजाने घेतले होते.सदर रकमेपोटी मी व्याजासहीत त्यास 9,71,85000/- कोटी परत दिले होते.असे असतानाही अजुन 08 कोटी रुपये पाहीजेत तर मी तुला जमीन देइन, असे मला सांगितले. त्यामुळे सावकार रामदास काळे याने माझी फसवणुक केल्याचे लक्षात आलेने मी दि. 19/05/2025 रोजी पोलीस आयुक्तालय पुणे येथील एक खिडकी योजना येथे सावकार रामदास जगन्नाथ काळे यांचेविरुध्द तक्रार अर्ज केला होता त्याचा क्र. E2158699 असा होता. माझा अर्ज पुढील चौकशीकामी आर्थिक गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडे देणेत आला. त्या अर्जास 315/25 असा क्रमांक देणेत आला आहे. दि. 07/11/2025 रोजी मला चौकशी अधिकारी व्ही एम तोटेवार सहा पोलीस निरीक्षक यांनी आर्थिक गुन्हे शाखा पुणे शहर येथे बोलावुन दि.08/11/2025 रोजी सदर अर्जाचे अनुषंगाने चौकशीकामी कागदपत्रासह हजर राहणेबाबत समजपत्र दिले. सदर समजपत्रावर जा.क्र./वपोनि /आगुशा/092/2025 दि.07/11/2025 असा क्रमांक असुन व्ही एम तोटेवार सहायक पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा पुणे शहर यांची सही व मोनं. 7758939704 असा नमुद आहे.माझ्या सदर तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने माझे व साक्षीदारांचे जाबजबाब नोंदवणेत आले.त्यानंतर माझ्या



Scanned with CamScanner

अर्जाचा पाठपुरावा करीत असताना मला चौकशी अधिकारी श्रीमती तोटेवार यांनी मी दिलेल्या अर्जाची चौकशी माझ्या बाजुने करुन समोरच्या पार्टीवर कारवाई करुन माझी जमीन मला परत करुन देते त्या करीता मला 30 लाख रुपये दयावे लागतील असे सांगितले.त्यावेळी मी नाईलास्तव त्यांना होकार देऊन 30 लाख रुपयापैकी 02 लाख रुपये डिसेंबर महिन्यामध्ये त्यांचे कार्यालयात दिले.

त्यानंतर माझ्या अर्जाचा पाठपुरावा केला असता मला समजले की, यामधील गैरअर्जदाराचे कोणतेही जबाब घेण्यात आले नाही.चौकशी अधिकारी तोटेवार यांनी मला कार्यालयात बोलावून घेतले व मला सांगितले की,रामदास काळे हे सदरची जमीन स्थानिक लोकांना विक्री करणार आहेत. जर तुम्हाला तुमची जमीन पाहीजे असेल तर तुम्हाला रामदास काळे यांना 01 कोटी रुपये दयावे लागतील असे सांगितलेने मी सावकार रामदास काळे यास 25 लाख रुपये, गणेश रामदास काळे याचे नावे 50 लाख रुपये व हेमंत रामदास काळे याचे नावे 25 लाख रुपये असे प्रत्येकी 25 लाखाचे 4 डि डि एकुण 01 कोटी रुपये दि.20/02/2026 या तारखेचे डि डि काढुन तोटेवार मॅडम यांचेकडे दिले. त्यांनी ते गैरअर्जदार यांना दिले. त्यानंतर मला काळे व तोटेवार यांचे मध्यस्थ असलेले निलेश विलास हरगुडे यांचेकडुन असे समजले की, श्रीमती तोटेवार व रामदास काळे त्या पैशामध्ये प्रत्येकी 50 लाख रुपये आपसात वाटुन घेतले आहेत. आणि तुम्ही रामदास काळे यांचेविरुध्द केलेला अर्ज मागे घ्यावा म्हणुन खोटा गुन्हा दाखल करणार आहेत. त्यानंतर दि.24/04/2026 रोजी माझा मो.नं.9822376624 यावर व मुलगा अजित बाळासाहेब आवताडे याचा मो.नं.9923133131 या नंबरच्या व्हॉटस्. अँप वर चौकशी कामी हजर राहणेबाबतचे मॅडम तोटेवार यांचे मोबाईल नंबर 7758939704 चे व्हॉटस् अँप वरुन समजपत्र प्राप्त झाले. या संदर्भात मी व माझा मुलगा दि.27/04/2026 रोजी आर्थिक गुन्हे शाखा येथे मॅडम तोटेवार यांना भेटलो असता त्यांनी माझे विरुध्द हेमंत रामदास काळे यांनी अर्ज क्र.102 /2026 हा तक्रारी अर्ज दाखल केला असल्याचे सांगितले व माझेकडे उर्वरीत 28 लाख रुपये ची मागणी करुन लगेच दोन दिवसात पैसे देणेस सांगुन मी रामदास काळे याचे विरुध्द केलेला तक्रारी अर्ज मला मागे घेण्यास सांगितले. जर दोन दिवसात पैसे दिले नाहीत तर माझे विरुध्द दाखल अर्जाच्या अनुषंगाने गुन्हा दाखल करुन मला अटक करावी लागेल असे सांगितले.

तरी आर्थिक गुन्हे शाखा येथील सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती व्ही एम तोटेवार हा माझ्याकडे मागणी करीत असलेल्या 28 लाख रुपये ही कोणतीही शासकीय फी नसून लाच रक्कम आहे. ती देण्याची माझी इच्छा नाही. सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती व्ही. एम. तोटेवार यांचेशी माझे कोणतेही आर्थिक व्यवहार नाहीत, तसेच त्यांचेशी माझे कोणतेही वैर नाही. तरी आपले विंभागामाफत त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई व्हावी हि विंनती"
त्यानंतर पंचानी व आम्ही सदर लेखी तक्रार वाचून त्यावर सहया केल्या आहेत. सदर तक्रारीचे अनुषंगाने दिंनाक 30/04/2026 रोजी तक्रारदार यांना आर्थिक गुन्हे शाखा कार्यालय पुणे आयुक्तालय येथे बोलावले असलेने त्या ठिकाणी त्यांना पंचांसह पाठवून पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.
त्यानंतर मी, तक्रारदार व पंचास शासकीय सोनी कंपनीचा व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली. एक नवीन सिंलबद मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन पंचासमक्ष त्याची पाहणी केली असता, त्यावर एका बाजुस Sandisk 32 GB Micro SD HC I C4 52010NA13Q BH MADE IN TAIWAN व त्याचे दुस-या बाजुस MCP-XY1/26 HF CE MMC08A215F-TO DLD XAH 2601 MADE IN TAIWAN असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदरचे मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले आणि पंचांना व तक्रारदार श्री. आवताडे यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून मेमरीकार्डमध्ये यापुर्वी कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रित नसल्याची त्यांची व पंचाची खात्री करून दिली. तसेच निवेदन व सापळा कारवाईचे व्हिडीओ रेकॉर्डीग म.पो.हवा.गोरे यांचे मोबाईलमध्ये करण्यात येणार असलेचे सांगुन म.पो.हवा.गोरे यांचा मोबाईल फोन दाखविला व त्याकरिता वापरण्यात येणारे नवीन मेमरी कार्ड दाखविले त्यावर Sandisk 32 GB Micro SD HC I C4 52010NA13Q BH MADE IN TAIWAN व त्याचे दुस-या बाजुस MCP-XY1/26 HF CE MMC08A215F-TO DLD XAH 2601 MADE IN TAIWAN असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदर मेमरी कार्ड मपोहवा गोरे यांचे वैयक्तिक वापराचे विवो कंपनीचे मोबाईल मॉडेल नं.1935 यामध्ये टाकून चित्रीकरण थेटपणे मेमरीकार्ड मध्ये सेव्ह करण्याकरीता सेटींग केली व त्यामध्ये पुर्वीचे कुठलेही चित्रीकरण नसल्यांची पंचांना खात्री करून दिली.
त्यानंतर तक्रारदार व पंच यांचे डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये निवेदन घेण्यात आले त्याचे मपोहवा गोरे यांनी व्हिडीओ रेकॉर्डिग केले. तेव्हा 16.30 वाजले होते. तक्रारदार व पडताळणी/सापळा पथकास पडताळणी कारवाई अनुषंगाने सुचना दिल्या व पुढील पडताळणी व सापळा कारवाई ही लाप्रवि कार्यालयातुनच करण्याचे ठरविण्यात आले. तक्रारदार यांना पुन्हा सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार श्री आवताडे यांचे शर्टचे आतील बाजूस कोणास दिसणार नाही अशा बेताने लावला. तक्रारदार श्री. आवताडे व पंच क्र. 1 श्री. येवले यांना लोकसेविका यांचे कार्यालयात भेटण्याकरीता 16.56 वा. पाठविले त्यानंतर लोकसेविका हा कार्यालयात



Scanned with CamScanner

नसल्याने तक्रारदारांची त्यांचेशी भेट झाली नाही त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरून लोकसेविका तोटेवार यांचे मोबाईलवर फोन लावला त्यावेळी लोकसेविका यांनी तक्रारदारांना फाईलचे काम पुर्ण झाल्यावर फोन करा आपण भेटू असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार हे ला.प्र.वि. पुणे कार्यालयात परत आले.
त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेविका यांचे मोबाईलवरून 18.37 वा. व्हॉटस्अॅप कॉल आला तो रेकॉर्ड करण्यापुर्वी बंद झाला म्हणून तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरून लोकसेविका यांचे मोबाईल फोनवर कॉल करून लोकसेविका यांना भेटण्याचे ठिकाणाबाबत विचारणा करून लोकसेविकेस स्वारगेट परिसरात भेटण्यास येतो असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांना पुन्हा एकदा पडताळणीकामी सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार श्री आवताडे यांचे शर्टचे आतील बाजूस कोणास दिसणार नाही अशा बेताने लावला. तक्रारदार श्री. आवताडे व पंच क्र. 1 श्री. येवले यांना तक्रारदार यांचे चारचाकी इनोव्हा गाडी क्रमांक एम एच-12 क्यु एम 2530 यामध्ये लोकसेवक एपीआय तोटेवार यांचे भेट घेण्याकरिता स्वारगेट परिसरात रवाना केले तेव्हा 19.25 वाजले होते. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्रं 1 सापळा पथक थांबलेले ठिकाणी परत आले तेव्हा त्यांचा रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला तेव्हा 21.51 वाजले होते. तेव्हा पंच क्र 01 यांना लाप्रवि कार्यालयातून रवाना केलेपासून ते परत येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्र. 1 येवले यांनी पंच क्र 2 कदम यांचे समक्ष हकीगत सांगितली की, "पंच क्र. 1 हे तक्रारदार अवताडे यांचेसह स्वारगेट येथे गेले तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9822376624 वरुन तोटेवार यांचे मोबाईल क्रमांक 7758939704 च्या नंबरवर कॉल केला असता लोकसेविका तोटेवार हा त्यांना आजच काम करून घ्या असे तक्रारदारांना बोलत होत्या त्यावेळी तक्रारदारांनी आज चर्चा करू असे सांगितले तेव्हा लोकसेविकानी त्यांना नटराज हॉटेल येथे येण्याबाबत कळविले. त्याप्रमाणे तक्रारदारांसह पंच क्र. 1 नटराज हॉटेल येथे गेले. तेथे लोकसेविका तोटेवार मॅडम व एक इसम हजर होते तेथे तक्रारदार यांचे कामाचे अनुषंगाने बोलणे झाले. तेव्हा तक्रारदार हे लोकसेविका तोटेवार मॅडम याना "तुम्ही काय बोलले होते 30 लाख रुपये लागतेत तुम्हाला बरोबर का नाय " असे म्हणाले असता त्यावर तोटेवार मॅडम तक्रारदारांना "हा बरोबर" असे म्हणाल्या त्यावर तक्रारदार यांनी "तुम्ही काय सांगीतल मला 30 लाख लागतेत मला.. बरोबर ना"? असे विचारले त्यावर तोटेवार मॅडम यांनी "हा बरोबर" असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदार यांनी लोकसेवक यांना "तुम्ही तीस लाखातले कमी किती करताय तेवढ सांगा "आता माझ इतक मुश्कीलयना... मी दोन दोन, एक एक, लाख रूपये आणतोय आता सध्यस्थितीला असंय.. तुम्ही तीस लाखातले आता दोन तर गेलेत तुम्हाला...बरोबरय." असे म्हणाले असता लोकसेवक तोटेवार मॅडम तक्रारदार यांना म्हणाले कि, "नाही ऐका तीस करा." "बर ठिकेय जाऊदे तुमच्या हिशोबानी.." असे म्हणाल्या त्यावर तक्रारदार हे लोकसेविका तोटेवार मॅडम यांना "तुम्हाला दोन लाख मिळले का नाही एवढेच सांगा तुम्ही." असे म्हणाले असता लोकसेविका तोटेवार यांनी "ठिकय मिळालेत, गेलेत, जाऊ देत." असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदार यांनी परत त्यांना "मिळाले का नाही." असे विचारले असता त्यांनी "मिळाले..मिळाले.." असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदार त्यांना "मी..होका...मी..मी.. त्यांच्याकड काहीच बोलणार नाही.. हे संपल... तुम्ही आता अठ्ठावीस लाखातले किती कमी करू मला हे तेवढ सवलत दया."त्यावर लोकसेविका तोटेवार यांनी "बर तुमच काय म्हणणय." असे म्हणाल्या त्यावर तक्रारदार हे "तुम्ही सांगा आता माझ तर म्हणणंय की बाबा तुम्ही... काहीतरी कमी करा." त्यावर तोटेवार मॅडम यांनी तक्रारदारांना "आज किती करू शकता?, पुर्ण करणार...आज..असे मला विचारले. त्यावर लोकसेवक यांनी लाचेची रक्कम सकाळपर्यंत देण्याबाबत बजावले. त्यानंतर तोटेवार मॅडम त्यांचे बरोबर असलेले इसम चव्हाण यांचेशी तक्रारदारांना बोलणेस सांगितले. त्यावेळी सदर इसमाने त्यांचा मोबाईल नंबर 7219701881 सांगुन तक्रारदार यांना तुमची पैशांची तयारी झाल्यावर सांगा असे सांगितले. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता, ते तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच खरे असल्याची खात्री झाली. तक्रारदार यांचेकडे लोकसेविका सपोनि तोटेवार यांनी व खाजगी इसम चव्हाण यांनी 28,00,000/- रूपये लाच मागणी करून ती खाजगी इसम चव्हाण यांचे मार्फतीने स्वीकारण्याची तयारी दर्शविलेची खात्री झाली व रक्कम मोठी असलेने पुढील कारवाई दिनाक 01/05/2026 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. झाले करवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
दि. 01/05/2026 रोजी आम्ही कार्यालयात हजर असताना पंच क्र 1 व 2 हे सकाळी 10.30 वा कार्यालयात हजर झाले व तक्रारदार हे 13.35 वा कार्यालयात हजर झाले. तक्रारदार यांनी त्यांचेकडे दिड लाख रुपये असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे आम्ही उर्वरीत खेळण्यातील नोटा लाच रक्कम म्हणून वापरण्याचे सर्वानुमते ठरविले. पुढील सापळापुर्व कारवाई सुरु करून पुढील सापळा कारवाईकामी नवीन मेमरी कार्ड वापरण्याचे ठरविले. त्याप्रमाणे एक नवीन सीलपॅक व्हीएम एलाईट कंपनिचे 32 जीबी क्षमतेचे मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन पंचासमक्ष त्याची पाहणी केली असता, त्यावर एका बाजुस C- VM Elite 32 GB C10 U1 V10 micro SD HC I



Scanned with CamScanner

V10 व त्याचे मागील बाजुस EETF32GBC0925 असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदरचे मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले तक्रारदार यांनी भारतीय चलनातील रु 500 रु दराच्या 300 नोटा असे 1,50,000 /- रुपये हजर केल्या व उर्वरीत रक्कम जमा झाली नाही असे सांगितले तसेच त्याचवेळी संपुर्ण रक्कम असल्याशिवाय लोकसेविका व खाजगी इसम हे लाच रक्कम स्विकारणार नाहीत असेही सांगितले त्यामुळे लाचेची रक्कम पुर्ण करण्याकरीता खेळण्यातील 500 रु प्रमाणे दिसणा-या प्रत्येकी 100 नोटांचे 53 बंडल, ज्याची किंमत 26,50,000/- रुपये असे एकुण 28,00,000/- रुपये पुर्ण करण्यात आली. तक्रारदारांनी हजर केलेल्या नोटांचे नंबर कागदावर लिहून घेण्यात आले. सापळापुर्व पंचनाम्यादरम्यान लाच रक्कमेस अँन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता म.सहा.फौज. श्रीगार यांना कारवाईत सामील करून त्यांचे मार्फतीने दोन्ही पंच, तक्रारदार यांना अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून संपुर्ण लाचेची रक्कमेस अँन्थ्रासीन पावडर लावण्यात आली सदरच्या नोटांचे बंडल पांढ-या रंगाचे कापडी पिशवीमध्ये ठेवून कापडी पिशवीस अँन्थ्रासीन पावडर लावून सदरची पिशवी तक्रारदार यांचेकडील इनोव्हा कार क्रमांक.MH12QM2530 या वाहनामध्ये पुढील सिटचे मागील बाजूस ठेवण्यात आली त्यानंतर म.स. फौ.श्रीगार यांना कारवाईतून वगळण्यात आले.
त्यानंतर सापळापुर्व कारवाई पुर्ण करुन लाच रक्कम देण्याचे ठिकाण सुनिश्चित करण्यासाठी तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल नं. 9822376624 यावरुन तोटेवार मॅडम यांचे मो.नं. 7758939704 यावर फोन केला असता, तोटेवार मॅडम यांनी फोन स्विकारला नाही. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरुन खाजगी इसम चव्हाण यांना त्यांचे मो.नं. 7219701881 यावर केला असता त्याने देखील फोन स्विकारला नाही. त्यानंतर 19.41 वा खाजगी इसम चव्हाण याचा मिस कॉल आला. त्यानंतर तक्रारदार यांनी 19.42 वा चव्हाण यास त्याचे मोबईलवर कॉल केला त्यावेळी कॉल मध्येच कट झाल्यानंतर चव्हाण याचा पुन्हा 19.45 वा फोन आला तेव्हा चव्हाण याचेसोबत उद्या दि. 02/05/2026 रोजी भेटण्याचे ठरलेने पुढील कारवाई दिंनाक 02/05/2026 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यावेळी तक्रारदार यांनी हजर केलेली भारतीय चलनातील रु 500 रु दराच्या 300 नोटा असे 1,50,000/- रुपये व खेळण्यातील 500 रु प्रमाणे दिसणा-या प्रत्येकी 100 नोटांचे 53 बंडल, ज्याची किंमत 26,50,000/- रुपये असे एकुण 28,00,000/- रुपये लाच रक्कमेस अँन्थ्रासीन पावडर लावण्याची कार्यवाही झाली असल्याने सदरच्या नोटांचे बंडल पांढ-या रंगाचे कापडी पिशवीमध्ये तशीच ठेवून सदरची पिशवी सिंलबद करुन आमचे कार्यालयातील कपाटामध्ये सुरक्षित ठेवण्यात आली. झाले करवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
दिलेल्या सुचनेप्रमाणे दि. 02/05/2026 रोजी लोकसेवक एपीआय तोटेवार मॅडम यांना लाच रक्कम देणेचे अनुषंगाने सापळा पथक व पंच असे सर्वजण ठरल्याप्रमाणे 10.00 वा लाप्रवि कार्यालयात हजर झालो. तक्रारदार देखील 11.00 वा हजर झाले. तेव्हा तक्रारदार यांनी आम्हास सांगितले की, 10.04 वा खाजगी इसम चव्हाण याने त्यांचे मो.नं. 7219701881 यावरुन व्हॉट्सअप कॉल आल्याचे व तो त्यांनी रेकॉर्ड केल्याचे सांगितले. त्यांनी आज किती वाजता येणार आहे व सगळे पैसे तयार आहेत का याबाबत विचारणा केली आहे. तसेच एपीआय तोटेवार यांचा 10.28 वा त्यांचे मो.न. 7758939704 यावरुन व्हॉट्सअप कॉल आल्याचे सांगितले. त्यांचेशी माझे कामाबाबत बोलणे झाले व आजच चव्हाण यांना भेटून करुन घेणेबाबत सांगितले. तेव्हा सर्वानुमते पुढील सापळा कारवाई करण्याचे नियोजन करुन, दि. 01/05/2026 रोजी आमचेकडे कार्यालयाचे कपाटामध्ये सिंलबद केलेली लाच रक्कम मपोशि शिल्पा तुपे यांचेकरवी बाहेर काढून, पंचासमक्ष सदरचे सिल फोडून लाच रक्कम काढली. त्यामध्ये तक्रारदार यांनी हजर केलेली भारतीय चलनातील रु 500 रु दराच्या 300 नोटा असे 1,50,000/- रुपये व खेळण्यातील 500 रु प्रमाणे दिसणा-या प्रत्येकी 100 नोटांचे 53 बंडल, ज्याची किंमत 26,50,000/- रुपये असे एकुण 28,00,000/- रुपये असल्याची खात्री करुन घेतली. त्यानंतर आम्ही पुन्हा तक्रारदार व पंच यांना अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म सांगुन प्रात्यक्षिक करुन दाखविले व मपोशि शिल्पा तुपे यांचेकरवी त्यास पुन्हा अँन्थ्रासीन पावडर लावून सदर रक्कम पाढ-या कापडी पिशवीमध्ये ठेवून ती तक्रारदार यांचे इनोव्हा कार क्रमांक. MH12QM2530 या गाडीचे मागील डिक्कीमध्ये ठेवली. सापळा कारवाईचे अनुषंगाने सर्वांना पुन्हा सुचना देवुन दिंनाक 01/05/2026 रोजीचे सीलबंद मेमरीकार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकुन व दि. 30/04/2026 रोजीचे व्हिडीओ रेकॉर्डींग करावयाचे मेमरी कार्ड मपोहवा गोरे यांचे वैयक्तिक वापराचे विवो कंपनीचे मोबाईल टाकुन सुस्थितीत असल्याची खात्री करुन दिली.
त्यानंतर तक्रारदार व पंच याचे सापळापुर्व निवेदन घेतले. त्याचे मपोहवा गोरे मॅडम यांनी व्हिडीओ रेकॉर्डिंग केले तेव्हा 12.11 वाजले होते. सापळा कारवाईकामी भेटण्याचे ठिकाण सुनिश्चित करण्याकरीता तक्रारदार यांनी 12.25 वा त्यांचे मोबाईलवरुन खाजगी इसम चव्हाण यांचे मोबाईलचे व्हॉट्सअँपवर कॉल केला असता, वाडीया कॉलेज या ठिकाणी भेटण्याचे ठरले. तेव्हा त्यांनी अर्ध्या तासात त्या ठिकाणी पोहोचतो असे सांगितले. तेव्हा पडताळणीमध्ये



Scanned with CamScanner

झालेल्या संभाषणानुसार खाजगी इसम चव्हाण यांस संशय येवू नये म्हणून सापळा कारवाईमध्ये तक्रारदार यांचेसोबत पंच क्र. 2 कोमल कदम यांना पाठविण्याचे ठरविले. मी पुन्हा सर्वांना सुचना देवुन पंच क्रमांक 01 सापळा पथकातील अंमलदार असे सापळा कारवाईकरिता आवश्यक सर्व साहीत्यासह सरकारी वाहन क्रमांक MH12UC4109 यामध्ये बसलो व दोन कर्मचारी खाजगी दुचाकीवर घेतले.तेव्हा व्हाईस रेकॉर्डर चालु करुन होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार श्री अवताडे यांचे शर्टचे आतील बाजूस लावला. तक्रारदार श्री. अवताडे व पंच क्र. 2 श्रीमती कदम यांना तक्रारदार यांचे इनोव्हा कार क्रमांक. MH12QM2530 यामध्ये बसवुन खाजगी इसम चव्हाण यास वाडीया कॉलेज येथे लाच रक्कम देण्याकरिता रवाना केले. ती वेळ 12.45 वा. होती. आम्ही उर्वरित सापळा कारवाई पथक काही अंतराने त्याचे मागोमाग साधुवासवानी चौक मार्गे जावून कॉनरॅड हॉटेलपासून काही अंतरावर थांबुन गाडीतुन उतरून कॉनरॅड हॉटेलचे समोरील सार्वजनीक रोडवर व परिसरात तक्रारदार दिसतील अशा बेताने थांबुन राहीलो. काही वेळाने एक कॅप घातलेला इसम तक्रारदार यांचे वाहनाजवळ आला व त्यांचे गाडीत बसला. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार, पंच क्र 2 व सदर इसम गाडीतून खाली उतरले व मागील बाजूस आले. तेव्हा तक्रारदार यांनी गाडीची डिक्की उघडली व त्यामधील लाच रक्कमेची पिशवी गाडीतून काढून पंचासमक्ष सदर इसमास दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी डोक्यावरून दोन वेळा हात फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्वनियोजीत इशारा केल्याने सापळा पथकाने नमूद इसमास ताब्यात घेतले. तेव्हा मपोहवा गोरे यांनी तक्रारदार यांचेकडील रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला तेव्हा 13.09 वाजले होते. पंच क्रमांक 1 देखील आले. पंच क्रमांक 02 श्रीमती कदम यांना लोकसेवक यांनी लाच रक्कम कोठे ठेवली यांबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले कि, तक्रारदार यांनी डिक्कीमध्ये पैसे असलेली पिशवी खाजगी इसम चव्हाण याचेकडे दिली असता त्याने ती दोन्ही हाताने स्विकारली व सापळा पथक जवळ आल्यानंतर ती पिशवी तक्रारदार यांचे गाडीचे डिक्कीमध्ये परत ठेवली आहे. त्यावेळी सापळा पथकाने सदर इसमास ताब्यात घेऊन दोन्ही हात पकडले. त्यावेळी त्यांचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव - श्री संभाजी शिवाजी चव्हाण, वय 47 वर्ष, धंदा - भाजी आडत व्यापारी, रा. 1291, चव्हाणवाडा, चिमन्या गणपती शेजारी, सदाशिव पेठ, पुणे असे सांगितले.

तेव्हा सदरची पिशवी पंच क्र 1 यांना घेण्यास सांगितले. आरोपी चव्हाण यास शासकीय वाहनामध्ये बसून पंचासमक्ष तेथे कक्षात कृत्रिम अंधार करून अँल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात पाहीले असता आरोपी चव्हाण यांचे दोन्ही हाताचे तळावर देखील अँथ्रॅसीन पावडरची चकाकी दिसुन आली. त्यानंतर नोटा ठेवलेल्या पांढ-या पिशवीवर व आतील नोटांची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात पाहणी केली असता पिशवीवर आतील बाजूस व लाच रक्कमेस अँथ्रॅसीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. तसेच त्यनंतर पंच क्रमांक 01 यांनी यापुर्वी कागदावर लिहेल्या नोटांचे नबंर व प्रत्यक्ष नोटाचे नंबरची पाहणी केली असता ते एकच असल्याची खात्री झाली. त्यानंतर तक्रारदार यांचे हाताची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात पाहणी केली असता त्यांचे दोन्ही हाताचे तळव्यास, अँथ्रॅसीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर शासकीय वाहनातून उतरुन तक्रारदार यांचे वाहनाचे डिक्कीची काळया कपडयाने कृत्रीम अंधार करुन पाहणी केली असता, डिक्कीचे आतील बाजूस अँथ्रॅसीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली.

त्यानंतर पंचासमक्ष तक्रारदार यांना रेकॉर्डर लावलेपासुन बंद करेपर्यत काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले कि, ते व पंच असे खाजगी इसम चव्हाण यास भेटण्यास जात असताना चव्हाण याचा दोन वेळा कॉल आला, तेव्हा आमचे कॉनरॅड हॉटेल येथे भेटण्याचे ठरले. त्याप्रमाणे आम्ही कॉनरॅड हॉटेलचे समोरील रोडवर भेटलो. तेव्हा खाजगी इसम चव्हाण हा माझे गाडीमध्ये येवून बसला. तेव्हा आमचेमध्ये सोमवारी काम करुन देणेबाबत बोलणे चालू असताना एपीआय तोटेवार यांचा खाजगी इसम संभाजी चव्हाण यांचे मोबाईलवर फोन आला. संभाजी चव्हाण यांने तोटेवार मॅडमशी बोलून फोन माझेकडे दिला. मी फोन घेवून प्रथम स्पीकरवर ठेवला व त्यांचेशी माझे कामाबाबत बोलणे चालू केले तेव्हा, मी त्यांना 'नाय नाय नाय..नाय.. होका... मी करतोय.. मी विषय विषय..त्यो नाय मी करतो काम तुमच आता.. त्यो विषय नाय... ती सगळची सगळ ही केल्यात.... अठ्ठावीस लाखच्या आठ्ठावीस लाख आणल्यात...तो पण मुद्दा नाय.. फॅक्टली विषय असाय.. की मला सोमवारी आता आज सुट्टीय आता नाहीतर आज केल असत मी ती' असे म्हणालो असता, एपीआय तोटेवार हया 'हां..' अस म्हणाल्या. त्यावर मी 'सोमवारी मला सकाळ सकाळ किती वाजता पाठवणार त्याला माझ्याकड...' असे म्हणालो असता, त्यांनी 'आं.. तुमच्याकड कशाला.. ह्याच्याकड.. पाठवितेना..डायरेक्ट..अं... लोणीकाळभोरलाना... किती वाजता पाठवाव लागेल बारा वाजता..' असे म्हणाल्या. म्हणजे माझे व्याजापोटी रामदास काळे याने घेतलेली जमीनीचा कागद माझे नावावर करुन देण्यासाठी लोणीकाळभोर येथे रजिस्ट्री ऑफिसला पाठविणेबाबत बोलणे झाले. त्यानंतर आमचेमध्ये भेटण्याबाबत चर्चा झाली. नंतर संभाजी चव्हाण याने माझेकडुन फोन घेवून तो मॅडमशी बोलला व त्यानंतर आम्ही गाडीमधून उतरुन गाडीचे मागील बाजूस गेलो व मी गाडीची डिक्की खोलून त्यामधील लाच रक्कम ठेवलेली पांढरी पिशवी माझ्या



Scanned with CamScanner

दोन्ही हाताने काढून संभाजी चव्हाण याचेसमारे धरली असता, त्याने ती दोन्ही हाताने स्विकारली व त्यानंतर मी सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा केला. सापळा पथक जवळ आल्यानंतर संभाजी चव्हाण याने ती पिशवी गाडीचे डिक्कीमध्ये परत ठेवली त्यानंतर तुम्ही संभाजी चव्हाण यांना ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही पंच क्रमांक 02 यांना देखील विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांचेप्रमाणे मिळती जुळती हकीगत सांगितली. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष ध्वनीमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता तक्रारदार व पंचानी सांगितलेप्रमाणे हकीगत बरोबर आहे. त्यानंतर ला.प्र.वि.कडील अधिका--यांमार्फत लोकसेवीका श्रीमती वैशाली मुरलीधर तोटेवार, वय 49 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- सहा. पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर, रा. 12/5, स्वारगेट पोलीस अधीकारी वसाहत, पुणे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. लोकसेविका श्रीमती वैशाली तोटेवार यांचेकडे तक्रारदार यांचे शासकीय काम प्रलंबित असलेले दस्तऐवज प्राप्त करून घेण्यात आलेले आहेत. पडताळणी व सापळा कारवाईदरम्यान ऑडीओ व व्हिडीओ रेकॉर्डींग करण्याकरीता वापरलेले मेमरी कार्ड मधील फाईलस्च्या हॅश व्हॅल्यू घेण्यात आल्या आहेत. सदरचे मेमरी कार्ड जप्त करण्यात आले आहे. सापळा कारवाईदरम्यान दोन्ही आरोपींनी गुन्हा करताना वापरलेले मोबाईल फोन, खाजगी इसम संभाजी चव्हाण याचे ताब्यातून प्राप्त झालेली लाचेची रक्कम जप्त करण्यात आले असून सदर झाले कारवाईचा सविस्तरपणे पंचनामा करण्यात आलेला आहे.
तरी आरोपी 1) लोकसेवीका श्रीमती वैशाली मुरलीधर तोटेवार, वय 49 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- सहा. पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर, रा. 12/5, स्वारगेट पोलीस अधीकारी वसाहत, पुणे यांनी दिंनाक 30/04/2026 रोजी हॉटेल नटराज, स्वारगेट, पुणे येथे झालेल्या पडताळणी कारवाईदरम्यान तक्रारदार यांचे अर्जाची चौकशी त्यांचे बाजुने करुन समोरच्या पार्टीवर कारवाई करुन तक्रारदार यांची जमीन त्यांना परत करुन देण्याकरीता व तक्रारदार यांनी उर्वरीत 28 लाख रूपये अद्यापपावेतो लोकसेवक यांना न दिल्याने दरम्यानचे काळात तक्रारदार यांचेविरूध्द समोरच्या पार्टीने दिलेल्या तक्रार अर्जावर तक्रारदार यांचेवर कारवाई न करण्यासाठी स्वत: करीता 30 लाख रुपयाची मागणी करुन त्यापैकी पुर्वी 2 लाख रुपये स्विकारल्याचे मान्य करुन उर्वरीत 28,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन ती रक्कम सोबत असलेला खाजगी इसम श्री. संभाजी शिवाजी चव्हाण याचेकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. खाजगी इसम आरोपी क्र. 2) श्री. संभाजी शिवाजी चव्हाण, वय 47 वर्ष, व्यवसाय - भाजी आडत व्यापारी, रा. 1291, चव्हाणवाडा, चिमण्यागणपती शेजारी, सदाशिवपेठ, पुणे यांनी लोकसेविका तोटेवार यांचेसोबत उपस्थित राहून तक्रारदार यांस लाच रक्कम देण्यास प्रोत्साहन दिले व दिंनाक 02/05/2026 रोजी सापळा करवाई दरम्यान खाजगी इसम संभाजी शिवाजी कदम याने पंचासमक्ष 28,00,000 /-रूपये लाच रक्कम स्वीकारली असता त्यास ताब्यात घेण्यात आले असून माझी आरोपी क्र. 1) लोकसेवीका श्रीमती वैशाली मुरलीधर तोटेवार, वय 49 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- सहा. पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर, रा. 12/5, स्वारगेट पोलीस अधीकारी वसाहत, पुणे व 2) श्री. संभाजी शिवाजी चव्हाण, वय 47 वर्ष, व्यवसाय - भाजी आडत व्यापारी, रा. 1291, चव्हाणवाडा, चिमण्यागणपती शेजारी, सदाशिवपेठ, पुणे याचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम 1988 चे कलम 7, 7 अ, 12 अन्वये सरकारतर्फे कायदेशीर फिंयाद आहे.
माझा वरील फिंयादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलीखीत करण्यात आलेला असुन तो मी वाचुन पाहीला असुन बरोबर आहे.

समक्ष

हा फिंयादी जबाब दिला



Scanned with CamScanner

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Vijaykumar Udaybhanu Doke(I (Inspector)) / DEDVUDM7701 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

(ठाणे अंमलदार)
कोरेगाव पार्क पो.स्टे., पुणे शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Vijaykumar Udaybha
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DEDVUDM7701



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.** (जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner